

# भविष्य ओटीत घेतले...

हॅलो मेडिकल फौंडेशनच्या सोलापूर शहरातील शुअर स्टार्ट कार्यक्रमातील अनुभवकथा

*’आयाबायांच्या जुटानं*

***भविष्य ओटीत घेतले***

*चार हाती झेलताना*

*नवे आकाश उजळले”*



ज्यांनी इतरांच्या आयुष्यातील अंधार दूर करण्यासाठी अंतरीचे दिवे उजळले, इतरांचे सोसणे दूर करण्यासाठी आत्मभानाचे बीज रोवले, इतर महिलांचे आयुष्य उन्नत करण्यासाठी झटणाऱ्या तमाम स्त्रियांना समर्पित

**भविष्य ओटीत घेतले...**

प्रकाशक: हॅलो मेडिकल फाऊंडेशन

संपादन व छायाचित्रे: विद्या कुलकर्णी

मांडणी: अशोक निर्गुळकर

छपाई: मुद्रा

प्रकाशन: आठ मार्च २०१० निमित्ताने

# अनुक्रम

प्रस्तावना

१. माता मृत्यू – समस्या सामाजिक, उत्तर सामूहिक

२. सुरक्षित बाळंतपणासाठी प्रयत्नशील वस्ती स्वयंसेवक

३. घरगुती बाळंतपणांची समस्या

४. माता-शिशु आरोग्याला घातक सामाजिक चालीरिती

५. नोंदणी, तपासणीचे महत्त्व उमजले...

६. मानसिक आधार मिळाला...

७. सुमन बचत गटाचा आगळावेगळा निर्णय

८. शहापूर चाळीतील "सहेली"

९. रसिकाताई – गरोदर मातांचा हक्काचा आधार

१०. गरोदर मातांना सक्षम करणाऱ्या वस्ती स्वयंसेवक

११. आरोग्य शिक्षण कामी आले

१२. माता आणि शिशु आरोग्यासाठी दक्ष

१३. "आई, एचबी म्हणजे काय?"

१४. महाविद्यालयीन युवती करत आहेत आरोग्य जागृती

१५. बिस्मिल्ला महिला बचत गट

१६. तृप्तीला घर मिळाले

१७. आरोग्य सेवा महिलांपर्यंत आणणाऱ्या सिंधूताई

१८. सरकारी सेवांशी समन्वय

१९. जननी सुरक्षेचा लाभ

आरोग्य आणि हॅलो मेडिकल फाऊंडेशन या दोहोंचे नाते संस्थेच्या जन्मापासूनचे आहे. गेल्या सोळा वर्षापासून उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर व लोहारा तालुक्यातील सत्तर गावांतून संस्थेचे सर्वांगीण आरोग्याचे काम चालू आहे. आता २००७ पासून संस्थेने सोलापूर शहरात कामाची सुरुवात केली. पाथ या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या सहयोगाने हे काम चालू आहे व विषय स्त्री आरोग्याचाच आहे. ह्या संस्थेने महाराष्ट्रातील सात शहरांमध्ये 'शुअर स्टार्ट" नावाचा प्रकल्प हाती घेतला आहे. माता मृत्यू आणि बाल मृत्यू या गंभीर समस्येविषयी जाणीवजागृती करणे आणि त्याचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करणे असा या प्रकल्पाचा हेतू आहे. विविध शहरात विविध सामाजिक संस्थांनी या कामाची जबाबदारी घेतली असून प्रत्येकाच्या प्रकल्पाचे स्वरूपही वेगवेगळे आहे.

ग्रामीण भागातील व शहरी वस्त्यांमधील आरोग्याची तुलना केली तर या वस्त्यांमधील आरोग्यविषयक समस्या ग्रामीण आरोग्याच्या प्रश्नांप्रमाणेच किंबहुना त्यापेक्षाही बिकट आहेत, असे लक्षात येते. त्यातही माता व नवजात बालकांचे आरोग्य हा सर्वात संवेदनशील विषय आहे. हॅलो मेडिकल फाऊंडेशनने सोलापूरातील ७७ वस्त्यांमध्ये शुअर स्टार्ट प्रकल्पाचे काम सुरू केले आहे. माता व नवजात अर्भक मृत्यूदर कमी करण्याच्या उद्देशाने प्रस्थापित आरोग्य सेवा सक्षम व बळकट होऊन वस्ती पातळीवर कार्यक्षम आरोग्य सेवा मिळण्यासाठी काम करण्यावर कामाचा भर आहे.

सहसा सार्वजनिक आरोग्य सेवा यंत्रणेत लोकसहभाग असत नाही. आपल्या आरोग्याचा प्रश्न सोडवण्यासाठी सार्वजनिक सेवांनी कार्यक्षम असले पाहिजे असे लोकांना वाटते. आरोग्याचा प्रश्न सोडवणे ही केवळ शासनाची जबाबदारी आहे असे समजले जाते. स्थानिक मंडळे, बचत गट, युवक गट, व्यक्ती इत्यादींचा सहभाग असल्याशिवाय आरोग्याच्या समस्या कमी होणार नाहीत, अशी हॅलो मेडिकल फाऊंडेशनची भूमिका आहे. म्हणूनच संस्थेने शुअर स्टार्ट प्रकल्पाच्या कामासाठी 'स्वयंसेवी कार्यपद्धती"ची संकल्पना वापरण्याचे ठरवले. कोणताही प्रकल्प ठराविक मुदतीसाठी असतो. त्यानंतरही कामात खंड पडू द्यायचा नसेल तर स्थानिक व्यक्ती, समूहांनी सक्षम होऊन जबाबदारी स्वीकारली पाहिजे, अशी यामागची भूमिका आहे.

या प्रकल्पाचा आणखी एक विशेष म्हणजे यामध्ये संस्थेने समविचारी संस्था व व्यक्तींचे एक कृती मंडळ तयार केले आहे. सोलापूरमधील डॉ. वैशंपायन मेडीकल कॉलेजचा रोगप्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र विभाग, सोलापूर महानगरपालिकेचा आरोग्य विभाग व नागर वस्ती विकास योजना, सोलापूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आणि वालचंद समाजकार्य महाविद्यालय, ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालय, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय व युनियन सोशल एज्युकेशन सोसायटीचे महिला महाविद्यालय, ही महाविद्यालये या प्रकल्पाच्या कामात सहभागी आहेत.

स्वयंसेवी स्वरूपाचे हे काम करण्यासाठी वस्त्यांमधील बचत गट आणि वरील महाविद्यालयातील विद्यार्थिनी यांनी स्वयंसेवक म्हणून काम करण्याची तयारी दर्शवली आहे. बचत गटातील महिला वस्ती स्वयंसेवक म्हणून पुढे येत आहेत आणि परिसरातील गरोदर स्त्रियांना दत्तक घेऊन त्यांच्यामध्ये आरोग्याचे भान वाढवत आहेत. वस्तीतील महिलांना आरोग्य सेवा मिळाव्यात, आरोग्यविषयक सरकारी योजनांचा लाभ मिळावा यासाठीही त्या झटत आहेत. स्त्रियांच्या गटांप्रमाणेच किशोरींचे गटही तयार

होत असून मुलींमध्येही शिक्षण आणि आरोग्य याविषयीचे ज्ञान पोहोचवले जात आहे. संस्थेच्या आवाहनाला भरीव प्रतिसाद मिळाला आहे आणि ७७ वस्त्यांमधून २२९ महिला स्वयंसेविका, १८० बचत गट, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील २०० महाविद्यालयीन विद्यार्थिनी स्वयंसेविका सध्या कामात सहभागी आहेत. त्यासाठी आवश्यक आरोग्य शिक्षण, संवाद कौशल्ये आणि दृष्टीकोन व क्षमता बांधणीचे प्रशिक्षण सर्वांनाच दिलेले आहे.

प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील लोकसंख्या सुमारे एक लाख ऐंशी हजार आहे. आणि यामध्ये प्रजननक्षम वयोगटातील ९००० जोडपी आहेत. या स्त्रियांशी सातत्याने संपर्क राखणे, गरोदरपणाचे लवकरात लवकर निदान व नोंदणी होण्यासाठी मासिक पाळी सर्वेक्षण करणे आणि आरोग्य शिक्षण देणे हे दोन या प्रकल्पातील ठळक उपक्रम आहेत. शिवाय वेळोवेळी जनजागृती अभियानांचे आयोजनही केले जात असते. प्रकल्पासाठी पंचवीस प्रशिक्षित कार्यकर्त्यांची फळी काम करत आहे.

महिला बचत गटांची उर्जा केवळ आर्थिक व्यवहारांपुरती राहू नये, धनाबरोबरच मनाचे व्यवहार व्हावेत यासाठी हा प्रयत्न चांगल्या प्रकारे आकाराला येत आहे. बचत गटांनी आरोग्याच्या क्षेत्रात काम करणे हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम आहे. ज्या महिला गरोदर आहेत त्यांना हे गट दत्तक घेतात, म्हणजेच त्यांच्यापर्यंत आवश्यक सर्व आरोग्य सेवा पोहोचतील हे बघण्याची जबाबदारी घेतात. बारा आठवड्याच्या आत नाव नोंदणी, प्रसूतीपूर्व किमान तीन तपासण्या, प्रसूतीपश्चात दोन तपासण्या, धनुर्वाताचे दोन इंजेक्शन, शंभर लोहगोळ्या, संतुलित व पोषक आहार, दवाखान्यात बाळंतपण, धोक्याची लक्षणे, बाळाला जन्मानंतर अर्ध्या तासाच्या आत अंगावरचे पाजणे याशिवाय जननी सुरक्षा योजना अशा विविध विषयांचा समावेश असलेले आरोग्य शिक्षण बचत गट गरोदर महिलांना देत असतात. मार्च २००७ पासून २००९ अखेरपर्यंत एकूण ४४४१ गरोदर मातांचे आरोग्य शिक्षण या बचत गटांनी केले आहे. याशिवाय महापालिकेच्या आरोग्य यंत्रणेशी समन्वयाने सरकारी आरोग्य सेवा, तपासण्या, योजना यांचा अधिकाधिक महिलांना लाभ मिळेल यासाठी प्रयत्न होत आहेत. जाणीवजागृतीच्या दृष्टीने जे जाहीर कार्यक्रम घेतले जातात त्यामध्येही बचत गटांचा आणि महाविद्यालयील स्वयंसेविकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर आहे. मासिक पाळी सर्वेक्षणाच्या कामात महाविद्यालयीन विद्यार्थिनी सहभागी होत आहेत.

वस्तीपातळीवर शुअर स्टार्टचे काम कसे आकार घेत आहे, हे मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केला आहे. या प्रकल्पाच्या कामातून आलेले अनुभव, समस्येचे जाणवलेले स्वरूप आणि होत असणारे बदल इथे मांडले आहेत. विशेष म्हणजे संस्थेच्या ज्या कार्यकर्त्या वस्ती पातळीवर काम करतात त्यांचे हे स्वत:चे अनुभव आहेत. त्यांना लिहिते करण्यामधे आणि त्यांच्या अनुभवांचे हे पुस्तकरूप तयार करण्यामधे विद्या कुलकर्णी यांची अत्यंत मोलाची मदत झाली आहे.

वस्तीपातळीवरील काम करणाऱ्या बचत गटाच्या स्वयंसेवकांना शुअर स्टार्ट प्रकल्पाच्या माध्यमातून एक व्यासपीठ मिळाले आहे. त्यांना दिलेल्या अनेक प्रशिक्षणातून त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. आणि त्यांच्या कामातून समजात त्यांचा सन्मान केला जातोय. खऱ्या अर्थाने वंचितांचे सबलिकरणच या प्रकल्पातून होत आहे. त्यांचे प्रत्यक्ष वास्तव रेखाटणाऱ्या या जिवंत अनुभवकथांमधून प्रश्नाचे गांभीर्य आणि कामाची परिणामकारकता पुढे येईल असा विश्वास वाटतो.

**डॉ. शशिकांत अहंकारी (संस्थापक संचालक, हॅलो मेडिकल फौंडेशन)**

# माता मृत्यू – समस्या सामाजिक, उत्तर सामूहिक

सोलापूर शहराच्या मध्यवस्तीत राहणारी राजश्री. तेवीस वर्षांची. सातवीपर्यंत शिकलेली. दोन वर्षांपूर्वी लग्न होऊन शहरात आलेल्या राजश्रीला वर्षभरातच दिवस राहिले. पहिलं बाळंतपण माहेरी करायचं या रिवाजाप्रमाणे राजश्री सातव्या महिन्यानंतर माहेरी गेली. त्यापूर्वी एक वेळा गरोदर असल्याच खात्री करून घेण्यासाठी आणि एक वेळ लसीकरणासाठी अशी दोनदा ती एका खाजगी दवाखान्यात जाऊन आली होती.



राजश्रीचं माहेर म्हणजे एकदम आडगाव. तिथे ना दवाखान्याची सोय, ना डॉक्टरची. पण गावातल्या जाणत्या बायांनी तिला धीर दिला. आम्ही आहोत, काही काळजी करू नको.'माझ्या डोक्यावर जेवढे केस आहेत, त्यापेक्षा जास्त बाळंतपणं मी केलीत!" असं एकीनं तिला सांगितलं. राजश्रीलाही यामध्ये वावगं काही वाटलं नाही, कारण गावात असं होतंच हे तिलाही माहिती होतं. बाळंतपणाच्या वेळी मात्र सर्वांची कसोटी लागली. कळा सुरू झाल्या, बराच वेळ झाला. बाळ तिरपं असल्यानं बाळंतपण अडलं होतं. पण हे लक्षात येइपर्यंत बराच वेळ गेला. बाळ गर्भातच घुसमटलं आणि मृतावस्थेत जन्मलं.

बाळ गेल्यामुळे राजश्रीला दवाखान्यात वगैरे काही नेलं गेलं नाही. खरं तर ती खचली होती. मनानं आणि शरीरानंही. पण माहेरची परिस्थिती बेताची असल्याने तिनं काही बोलून दाखवलं नाही. दोन महिने माहेरी राहून ती परत सोलापूरला सासरी आली. सांसारिक व्यापात गुंतून गेली. काही महिन्यात तिला पुन्हा दिवस गेले. पहिल्या अनुभवावरून आता बाळंतपण गावात नाही, तर सोलापूरात करायचं असं ठरलं. पाळी चुकल्यानंतर तिसऱ्या महिन्यात राजश्रीच्या सासूनं तिला एका खाजगी दवाखान्यात नेऊन दिवस गेल्याची खात्री करून घेतली. नंतरही दोन-तीन महिन्यानी एकदा तिला दवाखान्यात नेऊन आणलं गेलं. राजश्रीला सातवा महिना चालू असताना डॉक्टरांनी सांगितलं की तिच्या रक्तातलं हिमोग्लोबीन (एचबी) कमी झालंय. रक्तवाढीच्या गोळ्या नियमित घेत जा. गरोदरपणाच्या सुरुवातीच्या महिन्यात एचबी दहा होतं, पण ते कमी झालं. आठव्या महिन्यात तर सहा पर्यंत खाली गेलं. दिवस भरायला लागले तरी रक्त कमीच राहिलं. डॉक्टरांनी रक्त चढवण्याचा सल्ला दिला. दोन दिवस असेच गेले. रक्त चढवण्याच्या आधीच अचानक एका सकाळी राजश्रीच्या पोटात दुखायला लागलं. ती घरीच बाळंत झाली. बराच रक्तस्त्राव झाला तरी बाळ सुखरूप आणि लगेच बाहेर आलं. नंतर राजश्रीच्या सासूनं बाळाला, आईला लसीकरणासाठी जवळच्या खाजगी दवाखान्यात नेऊन आणलं. सगळं ठीक आहे असं डॉक्टरांनी सांगितलं. बाळ सुदृढहोतं, आई चालती-बोलती होती त्यामुळे राजश्रीच्या प्रकृतीचा विषय मागेच पडला. बाराव्या दिवशी राजश्रीनं स्वत: दवाखान्यात

सोलापूरमधीलच आणखी एका वस्तीतील अज्ञानी. अगदी लहान वयात अज्ञानीचं लग्न झालं. ती फारशी शिकलीही नाही. १६ वर्षांची असताना तिला पहिल्यांदा दिवस गेले आणि एक मुलगी झाली. अज्ञानीचा नवरा वीटभट्टीवर काम करायचा. त्याच्याबरोबर तीही मजुरीला जायची. काही महिन्यात अज्ञानीला पुन्हा दिवस राहिले. पण गरीबी आणि कष्ट यामध्ये तिला स्वत:कडे लक्ष द्यायला फुरसतच नव्हती. नवराही तिची काळजी घ्यायचा नाही. उलट दारू पिऊन मारहाण करणे हा त्याचा नित्यक्रम होता. सहाव्या-सातव्या महिन्यात अज्ञानीच्या हाता-पायांवर सूज येऊ लागली. अज्ञानीची आई काळजीत पडली. मुलीला दवाखान्यात दाखवण्याच्या विचारानं आईने तिला माहेरी आणलं. चार दिवस होतात न होतात तोच नवरा तिला माघारी न्यायला आला. खरं तर अज्ञानीला वैद्यकीय तपासणीची, उपचाराची आणि विश्रांतीची गरज होती. पण नवऱ्यानं कांगावा केला. ’ही इथं राहिली तर माझं कोण करणार ? मला उपाशी ठेऊन मारून टाकायचंय काय ?” तशा परिस्थितीत नवरा तिला परत घेऊन गेला. गरोदरपणात अज्ञानीची खूपच हेळसांड झाली होती. अशक्तपणा, उपचारांचा अभाव, वाढलेला रक्तदाब या सर्व बाबींचा एकत्रित परिणाम होऊन आठवा महिना चालू असताना एके दिवशी घरी असताना तिला झटका आला. दवाखान्यात नेईपर्यंत आणखी काही वेळ गेला. कसलेच उपचार वेळेत न मिळाल्याने दवाखान्यात नेण्यापूर्वीच अज्ञानीचा मृत्यू झाला...

जेव्हा गरोदरपण अथवा बाळंतपण यांच्याशी निगडीत अशा कारणाने एखाद्या महिलेचा मृत्यू होतो तेव्हा त्याला माता-मृत्यू असे म्हणतात. गेल्या काही महिन्यात सोलापुरात जे माता मृत्यू झाले त्यापैकी या केवळ दोन घटना आहेत. एक लाख जिवंत बालकांच्या जन्मामागे जितक्या माता मरण पावतात त्याला माता मृत्यूचे प्रमाण असे म्हणतात. सध्या आपल्या देशात माता मृत्यू दर ३०४ आहे. म्हणजे एक लाख जिवंत बालकांच्या जन्मामागे ३०४ मातांचा मृत्यू होतो. सोलापूरात हे प्रमाण याही पेक्षा जास्त आहे.

माता-मृत्यू होतात, याहीपेक्षा जी कारणे सहजपणे आणि ठोस उपाययोजनांच्या साहाय्याने टाळता आली असती अशा कारणांमुळे हे मृत्यू होतात ही बाब अधिक चिंताजनक आहे. माता मृत्यूची अनेकविध कारणे संभवतात. पण त्यातील काही कारणे दूर करणे आपल्या हातात आहे. अगदी राजश्री आणि अज्ञानी यांचे मृत्यूही टाळता येण्यासारखेच होते.

राजश्रीचं लग्न योग्य वयात झालं. सासू सांगते त्यानुसार तिची प्रकृतीही सुदृढहोती. या झाल्या तिच्या जमेच्या बाजू. पण याव्यतिरिक्त तिच्या बाबतीत घडलेला सारा घटनाक्रम तुटीचाच आहे. पहिल्या खेपेला ना तिच्या नियमित तपासण्या झाल्या, ना दवाखान्यात नोंदणी झाली. पोटातील बाळ तिरपं आहे हे बाळंतपण होईपर्यंत तिला महितीच नव्हतं. नियमित तपासण्या झाल्या असत्या तर ही बाब वेळीच लक्षात आली असती व बाळंतपण अवघड जाणार हे आगाऊ माहिती असल्यानं आवश्यक खबरदारीही घेता आली असती. बाळंतपणानंतर मूल दगावलं त्यामुळे आईकडे दुर्लक्ष झालं. बाळ जिवंत असतं तर तिची जशी काळजी घेतली गेली असती तशी काळजी घेतली गेली नाही. तिला ना औषधोपचार मिळाले, ना विश्रांती. दुसऱ्या गरोदरपणात तिच्या दवाखान्यात तपासण्या झाल्या पण रक्त वाढावे म्हणून कोणतेच उपचार झाले नाहीत. बाळंतपणही अचानक घरीच झाले, म्हणजे दवाखान्यात नेण्याची तयारीही केलेली नव्हती. पहिल्या खेपेला बाळ दगावल्याने आईकडे दुर्लक्ष झाले, तर दुसऱ्या खेपेला बाळ सुखरूप जन्माला येऊनही तिच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष झाले. राजश्रीने दवाखान्यात नावनोंदणी केली असती, नियमित तपासण्या केल्या असत्या, रक्तवाढीच्या गोळ्या घेतल्या असत्या तर कदाचित तिचा जीव हकनाक गेला नसता.

अज्ञानीच्या बाबतीत तर तिचं लग्नच न कळत्या वयात झालं. गरिबी आणि कष्ट यामुळे पिचून गेलेल्या तिच्या शरीराला गरोदरपणाचा भार पेलवला नाही. तिनं ना नावनोंदणी केली, ना तपासण्या. गरोदरपणात आवश्यक ती काळजी तिच्या वाट्याला आली असती, नवऱ्याची मारहाण आणि अरेरावी यांना ती अटकाव करती तर तिच्यावर जीव गमावण्याची पाळी आली नसती.

माता मृत्यूची प्रामुख्याने दिसणारी आणि ज्यांना प्रतिबंध करणे शक्य आहे अशी काही कारणे म्हणजे रक्तस्राव, जंतूसंसर्ग, असुरक्षित किंवा अडलेले बाळंतपण, रक्तदाब इत्यादी. स्त्रियांमध्ये रक्तपांढरी अथवा ॲनिमियाचे प्रमाणही मोठे आहे. महाराष्ट्रात गरोदर स्त्रियांपैकी ५८% स्त्रियांमध्ये रक्तपांढरी असल्याचे आढळून येते. रक्ताचे प्रमाण कमी असण्याच्या जोडीला कुपोषण आणि त्यामुळे शरीराची अपुरी वाढया आरोग्यविषयक समस्याही स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळतात. एकूण माता मृत्यूपैकी २०% मृत्यू हे गरोदर स्त्रियांतील रक्तपांढरी आणि अपुरी शारीरिक वाढयामुळे होतात असे अभ्यासांतून निदर्शनास आले आहे.

राजश्री आणि अज्ञानीच्या मृत्यूमागे रक्तदाब, असुरक्षित किंवा अडलेलं बाळंतपण, शारीरिक हेळसांड, जंतूससर्ग आदी तत्कालिक कारणे आहेत. पण ही कारणे एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीत उद्भवतात. गरिबी, अशिक्षितपणा, स्त्रियांवरील हिंसाचार, न परवडणाऱ्या आरोग्य सेवा, सकस आहाराचा अभाव आदी सर्व गोष्टींचा एकत्रित प्रभाव स्त्रियांच्या शारीरिक-मानसिक आरोग्यावर व पर्यायाने त्यांच्या प्रजनन आरोग्यावर होत असतो. म्हणूनच माता मृत्यू ही एक सामाजिक समस्या आहे आणि तिच्यावर तोडगा काढणे हीसुद्धा सामाजिक जबाबदारी आहे. गरोदरपणात आणि बाळंतपणात कोणती काळजी घ्यायची याविषयी संबंधित स्त्रिया आणि तिचे कुटुंब यांची समज वाढली पाहिजे. त्यासाठी आवश्यक माहिती आणि साहाय्य तिला समाजातून, आरोग्य यंत्रणेकडून मिळाले पाहिजे. गरोदरपणातील तपासण्या आणि दवाखान्यात बाळंतपणे वाढण्यासाठी आरोग्ययंत्रणा सक्षम असली पाहिजे.

या व अशा सामाजिक बदलाच्या उपाययोजना करण्याच्या हेतूनेच हॅलो मेडीकल फौंडेशन सोलापूरमध्ये काम करत आहे. माता व शिशु आरोग्य सुदृढकरण्याच्या उद्देशाने संस्थेने शुअर स्टार्ट हा प्रकल्प हाती घेतला आहे. पाथ या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या वतीने महाराष्ट्रात एकूण सात महापालिकांच्या क्षेत्रामध्ये या स्वरूपाचे काम चालू आहे.

हॅलो मेडीकल फौंडेशन सोलापूरातील ७२ वस्त्यांमध्ये काम करत आहे. दरवर्षी ३५००-४००० गरोदर मातांशी थेट आरोग्य संवाद साधला जात आहे. यासाठी संस्थेच्या अनुभवी आणि प्रशिक्षित कायकर्त्यांच्या बरोबरीने शेकडो स्वयंसेवी कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. प्रकल्पाच्या जनजागृतीच्या कामात महाविद्यालयीन युवती सहभागी होतात. तर वस्तीपातळीवर माहिती आणि आधार देण्याचे काम बचत गट, वस्ती स्वयंसेवक करत आहेत.

माता मृत्यूच्या सामाजिक समस्येचे उत्तर सामूहिक प्रयत्नातून शोधण्याचा हा एक प्रयत्न आहे.

*(या लेखातील प्रसंग खरे आहेत, पण व्यक्तींची नावे बदलली आहेत)*

# सुरक्षित बाळंतपणासाठी प्रयत्नशील वस्ती स्वयंसेवक

सीमा म्हात्रे

विजापूर नाका वस्तीत राहणारी सुरेखा (नाव बदलले आहे). वय बावीस. सुरेखाला पहिल्या दोन लहान मुली झाल्या. नंतर तिला तिसऱ्यांदा दिवस गेले. पाळी चुकल्यावर एकदा दवाखान्यात जाऊन तिनं गरोदर राहिल्याची खात्री करून घेतली. सुरेखाची पहिली दोनही बाळंतपणं सरकारी दवाखान्यात झाली असली तरी दोन्ही वेळेला ती केवळ दोनदाच दवाखान्यात गेली – एकदा दिवस गेल्याची खात्री करायला आणि दुसऱ्या वेळेला बाळंतपणासाठी. गरोदरपणातल्या तपासण्या, रक्तवाढीच्या गोळ्यांचे सेवन, लसीकरण इत्यादी बाबी कशा आवश्यक आहेत हे तिसरी खेप असूनही तिला समजलेलं नाही. किंबहुना तिसरी खेप असल्यानंच ती काहिशी निर्धास्त होती. पहिल्या दोन गरोदरपणांचा अनुभव तिला होता. ती काही पहिलटकरणीसारखी अननुभवी नव्हती! सुरेखाचा नवरा रोजंदारीवर कामाला जायचा आणि सासूही मजुरीला जायची. नवरा आणि सासू दोघे सकाळी लवकर कामाला जायचे ते एकदम संध्याकाळी उशीरा परत यायचे. घरची सगळी कामं सुरेखा सांभाळायची. दवाखान्यात तिच्या सोबत जायला घरात कुणाला वेळंच नव्हता. सुरेखानंही स्वत:च्या प्रकृतीकडे फारस लक्ष दिलं नाही. वस्तीजवळच्या एका सेवाभावी दवाखान्यात तिनं बाळंतपणासाठी नाव मात्र घातलं. नवव्या महिना चालू असताना सुरेखाला अचानक जुलाबाचा त्रास होऊ लागला. जवळच्याच एका खाजगी डॉक्टरकडून गोळी आणून तिनं खाल्ली. आणि तेव्हाच तिला कळाही सुरू झाल्या. दवाखान्यात पोहोचल्यावर लगेचच ती बाळंत झाली. तिला तीन किलो वजनाचा मुलगा झाला. पण बाळाला श्वसनाचा त्रास सुरू झाला. ज्या दवाखान्यात बाळंतपण झालं तिथं बाळावर उपचार करण्याची सोय नव्हती. म्हणून बाळाला सरकारी दवाखान्यात हालवणं भाग पडलं. अर्थात त्यामुळे बाळाला आवश्यक उपचार मिळण्यासाठी उशीर झाला. जन्मानंतर दोन दिवसांनी बाळ गेलं. सुरेखाची सासू हताशपणे म्हणाली –'एका खड्ड्यात वाढवलेलं, दुसऱ्या खड्ड्यात पुरावं लागलं!" झालं ते मुकाट स्वीकारण्यावाचून सुरेखाकडंही काहीच पर्याय नव्हता...



*वेळेला धावून जाणाऱ्या शांताबाई घुले*

माता मृत्यूप्रमाणेच आणखी एक गंभीर सामाजिक समस्या म्हणजे नवजात बालकाचा मृत्यू. दर १००० जिवंत जन्मामागे २६० ते ३०० बालके कमी वजनाची जन्मतात, ३५-४० बाळांचा मृत्यू एक महिन्याच्या आत होतो. माता कुपोषित असल्याने कुपोषित बाळ जन्माला येते आणि कुपोषणाचे दुष्टचक्र चालू राहते.

कुपोषण वा कमी वजन असणे हे जसे नवजात मृत्यूचे एक महत्त्वाचे कारण आहे. तसेच याव्यतितिक्तही इतर काही महत्त्वाची आणि तातडीच्या उपचारांनी टाळता येण्यासारखी कारणे आहेत. सुरेखाच्या बाळाला ज्याप्रमाणे जन्मानंतर श्वसनाचा त्रास झाला,

तसे अनेक बाळांना होतो आणि तातडीच्या उपचारांनी तो दूरही करता येतो. पण सुरेखाच्या बाळाला लगेच उपचार मिळू शकले नाहीत. घराजवळ असल्याने सोयीचा पडेल या विचाराने ती ज्या दवाखान्यात बाळंतपणासाठी गेली तिथे बाळाला तातडीचे उपचार देण्यासाठी यंत्रणाच नव्हती.

कित्येकदा बाळंतपण घरी होतं आणि बाळाला आवश्यक तातडीच्या सेवा उपलब्ध होत नाहीत. शेरखान वस्तीतल्या छायाच्या बाबतीत असंच घडलं. तिची बाळंतपणाची दुसरी खेप होती. बाळ घरीच जन्मलं, पण खूप कमी वजनाचं होतं. जन्मानंतर काही तासातच बाळाचा मृत्यू झाला. छायाच्या बाबतीत जे घडलं ते सुनिताच्या बाबतीत मात्र टाळता आलं. सुनितच्या गरोदरपणात तिच्यावर ओढावलेला प्रसंग वस्ती स्वयंसेवक शांताबाई घुले यांच्यामुळे टळला.

सुनिताचे सात महिने भरल्यावर अचानक तिच्या अंगावरून जायला लागलं. तिनं तातडीनं शांताबाईंना बोलावलं. त्यांनी लगेचच तिला दवाखान्यात भरती केलं, तिचं बाळंतपण होईपर्यंत शांताबाई तिला धीर देत राहिल्या. अपुऱ्या दिवसांचं बाळंतपण झाल्यानं बाळ कमी वजनाचं भरलं. पण बाळ-बाळंतीण सुखरूप राहिले. आपण कुणाच्या तरी वेळेला उपयोगी पडलो ही भावना शांताबाईंना कामाची नवी उमेद देते. आपल्या सांसारिक जबाबदारीतून वेळ काढून त्या माता-शिशु आरोग्य देखभालीच्या कामाला वेळ देतात.



*गरोदर मातांशी थेट आणि सातत्यपूर्ण संवाद*

आज सोलापुरातील अनेक वस्त्यांमध्ये अशा कित्येक शांताबाई कार्यरत आहेत. या वस्त्यांमधील बचत गट आणि वस्ती स्वयंसेवक गरोदर स्त्रियांच्या पाठिशी उभे राहण्याचे आणि त्यांची काळजी घेण्याचे काम करत आहेत. गरोदर स्त्रियांना दत्तक घेऊन बचत गटांनी त्यांची सर्वतोपरी काळजी घ्यावी यासाठी हॅलो मेडीकल फौंडेशन काम करत आहे. प्रशिक्षणातून मिळालेल्या माहितीच्या आधारे वस्ती स्वयंसेवक माता व शिशु आरोग्याची काळजी घेण्याचे काम जबाबदारीच्या भावनेनं करत आहेत.

वस्तीतल्या गरोदर मातांची माहिती घेणं, त्यांना वारंवार भेटून त्यांच्या समस्या जाणून घेणं, गरोदरपणातील काळजी कशी घ्यायची याची माहिती देणं अशी विविध काम या वस्ती स्वयंसेवक करत आहेत. गरोदरपणातील वेगवेगळ्या टप्प्यांनुसार कशी माहिती द्यायची हेही या स्वयंसेवकांना माहिती आहे. गर्भातल्या बाळाच्या हालचालीकडे कसं लक्ष द्यायचं हे त्या समजून सांगतात. गरोदरपणातील जोखमीची लक्षणं कोणती हेही सांगतात. आणि बाळंतपणाची तयारी कशी करून ठेवायची हेही समजावतात. वस्ती स्वयंसेवकांच्या या कामाने त्यांच्या परिसरातील मातांच्या सुरक्षित बाळंतपणाचे प्रमाण नक्कीच वाढणार आहे.

# घरगुती बाळंतपणांची समस्या

सॉलेहा सय्यद, सुवर्णा घोडके

भारतामध्ये घरी बाळंतपणे होण्याचे प्रमाण आजही खूप मोठे आहे. याची कारणे बरीच आहेत. घरी बाळंतपण करताना प्रशिक्षित दाई आणि जंतुसंसर्ग टाळण्याची आवश्यक ती सर्व काळजी घेतली नाही तर आई व बाळ दोघांचा जीव धोक्यात येऊ शकतो. रुबिना मणियार वर अशी वेळ आली असती, पण उपचार लागू पडले. आज ती आणि तिचं बाळ सुखरूप आहेत.

शाहपुरे चाळीतील सहेली महिला बचत गटाने वस्तीतल्या रूबिना या गरोदर स्त्रीला दत्तक घेतले. सातवा महिना लागेपर्यंत रूबिना वस्तीत राहिली. तिने गोळ्या, इंजेक्शने वेळच्या वेळी घेतली. सातव्या महिन्यात ती माहेरी गेली. अक्कलकोटमधील चिक्कळगी हे तिचं गाव. या लहानशा खेड्यात तशी आरोग्याची सुविधा अशी काही नाहीच. रूबिनाची चुलतीच दाई असल्याने तीच घरी बाळंतपण करेल असे ठरले. रूबिनाही याला मान्य झाली कारण तिच्या मनात नाहकच दवाखान्याची भीती बसलेली होती. दवाखान्यात नेलं की पोट कापून बाळ काढतात ही या दाई असलेल्या चुलतीची समजूत आणि ती सांगून तिनं रुबिनाच्या मनातही भीती उत्पन्न केली. रूबिनाचे दिवस उलटून गेले. ९ महिने वीस दिवस झाले तरी तिला बाळंतपणाच्या वेदना जाणवल्या नाहीत. गावातल्या एका डॉक्टरने रुबिनाला कळा येण्यासाठी इंजेक्शन दिले. एवढे करून त्याने पुढची जबाबदारी दाईवर टाकली. तिने बाळंतपण केले. पहिलटकरीण असलेल्या रुबिनाचे मायांग ताणले गेले आणि फाटले. बराच रक्तस्त्राव झाला. नऊ दिवस तिला अशक्तपणा जाणवत होता, ताप येत होता. ताप उतरला नाही म्हणून १०व्या दिवशी तिला अक्कलकोटच्या दवाखान्यात भरती केलं. मायांगाच्या भागाला संसर्ग झाल्याने सूज आली होती. जंतुनाशकाने जखम स्वच्छ करून त्यांनी तिला सोलापूरच्या दवाखान्यात भरती करण्यास सांगितले. पाच दिवस आयसीयुमध्ये आणि तेरा दिवस जनरलमध्ये उपचार घेऊन रूबिना बरी झाली.

बाळाची प्रकृतीही खालावत होती. जन्मत: ३ किलो असलेलेल बाळ सहा दिवसांनी २ किलो झाले. सोलापूरच्या दवाखान्यात बाळावरही उपचार सुरू झाले. त्याच्या हृदयाला छिद्र असल्याच बालरोगतज्ज्ञानी सांगितले. उपचारांनी बाळाच्या वाढीबरोबरच त्रास कमी होत जाईल असे सांगितले. सध्या बाळ-बाळंतीण सुखरूप आहेत.

घरी बाळंतपण करण्याची प्रथा केवळ ग्रामीण भागातच आढळत नाही. शहरातही घरी बाळंतपणे करण्याचे प्रमाण मोठे आहे. याची कारणेही बरीच आहेत. काही वेळा प्रथा म्हणून वा सवयीनं केली जातात तर काही वेळा आरोग्य यंत्रणेविषयी वाटणारा दुरावा वा भीती कारणीभूत ठरते. शहरी वस्त्यांमध्ये घरे लहान असल्याने काही वेळेला स्त्रियांना ऐनवेळी केवळ बाळंतपणापुरते दवाखान्यात नेले जाते. गरोदरपणातल्या तपासण्या वा उपचार यासाठी दवाखान्यात न जाता ऐनवेळी बाळंतपणासाठी दवाखान्यात जाणे हाही एक घरगुती बाळंतपणासारखाच प्रकार आहे.

घरगुती बाळंतपणातील संभाव्य धोके महिलांना समजाऊन देऊन त्यांनी लवकरात लवकर नोंदणी, तपासणी करावी यासाठी शुअर स्टार्टतर्फे काम चालू आहे. बहुरूपीनगरमधल्या शीला मोरे या स्वयंसेवक सांगतात की 'आमच्या वस्तीमध्ये आधी घरातल्या बाळंतपणांचे प्रमाण खूप जास्त होते. पण आम्ही लोकांशी बोलून, त्यांना समजाऊन सांगितल्याने हे प्रमाण कमी होत आहे."

माता व शिशु आरोग्याच्या जोपासनेसाठी दवाखान्यात बाळंतपणे व्हावीत हे केंद्र शासनाचे धोरण आहे. त्यासाठी मातृत्व अनुदान योजनेतून दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील महिलांना लाभ दिला जात आहे. या जननी सुरक्षा योजनेची माहितीही वस्ती स्वयंसेवकांकडून लोकांपर्यंत पोहोचवली जात आहे. लोकांची मानसिकता हळूहळू बदलत आहे. बाळंतपणे घरी न करता दवाखान्यात व्हावीत यासाठी आरोग्य यंत्रणाही तत्पर आणि सक्षम राखण्याची जबाबदारी शासनावर आहे.



मृणालिनी रोहिले, सरस्वती पाटील

# माता-शिशु आरोग्याला घातक सामाजिक चालीरिती

यक्ती तितक्या प्रकृती, तशा समाज तितक्या चालीरिती! विवाह, गरोदरपण, बाळंतपण इत्यादीशी निगडीत विशिष्ट पारंपरिक चालीरिती अनेक समाजात आजही प्रचलित आहेत.

**नात्यातल्या नात्यात लग्नाची प्रथा -**

सविताला सहावा महिना चालू आहे. तेवीस वर्षांची, नववीपर्यंत शिकलेली सविता तब्येतीनं चांगली आहे. दिसायला निरोगी, उत्साही आणि शिकलीसवरलेली कविता हुषार आहे, जाणती आहे. पण तिचा गर्भ टिकतच नाही. पण सहा-सात महिने तिचा गर्भ राहतो, व्यवस्थित वाढतो आणि मग पडतो. यापूर्वी तिचा दोनदा गर्भपात झाला आहे. आताच्या वेळेला अजूनतरी सर्व ठीक आहे. सविताचं लग्न तिच्या मामाशी झालं आहे. आपल्याच नात्यात लग्न करायचं ही या भटक्या समाजाची प्रथा आहे. या समाजानं पारंपरिक व्यवसाय सोडला, राहणीमान बदललं, पण नात्यातल्या नात्यात लग्नसंबंध जोडण्याची पारंपरिक प्रथा काही अजून सोडलेली नाही. अशा लग्नाचा गंभीर परिणाम स्त्रियांच्या प्रजननक्षमतेवर पडू शकतो. जवळच्या नात्यात लग्न झाल्यानं गर्भ टिकत नाही असं डॉक्टरांचंही म्हणणं आहे.

जर बाळाचा जीवच कमजोर होणार असेल तर जुन्या रूढींना धरून कसं चालेल ? हा प्रश्न आता इथल्या स्त्रियांच्या मनात येतो. तसं त्या उघडपणे बोलूनही दाखवतात. आपल्या समाजातल्या प्रथा बदलायला पाहिजेत असंही त्यांना आता वाटतंय.

अर्थात अशा प्रथा सामाजिक अपारिहार्यतेमुळेही चालू राहतात. प्रत्येक समाजाचे विवाहविषयक नियम बंदिस्त आहेत. कोणी कोणाशी बेटी व्यवहार करायचा याचे काटेकोर नियम असतात. सामाजिक अभिसरणाशिवाय नात्यातील लग्नाची प्रथा कशी बदलणार हा एक प्रश्नच आहे.

**पोटातलं येऊ नये म्हणून पोटाला डागण्या -**

मुकुंदनगरमधली रेखा शुअर स्टार्टच्या संपर्कात आली तेव्हा दुसऱ्यांदा गरोदर होती. नोंदणी, नियमित तपासणी, गोळ्यांचे सेवन इत्यादी गरोदरपणातली सर्व काळजी तिनं व्यवस्थित घेतली आणि सुदृढबाळाला जन्म दिला. तीन तासात बाळाला चीक दूध पाजले. शिकलेले सर्व तिने अमलात आणले. पण एका बाबतीत मात्र तिला घरच्यांचे मन बदलता आले नाही. रेखाच्या समाजात लहानग्या बाळाच्या पोटाला डागण्या देण्याची प्रथा आहे. लहान जीव असताना पोटाला चटके दिले की पोटातलं होत नाही म्हणजे मूल आजारी पडत नाही, धट्ट होतं असा समज आहे. बाळ दोन आठवड्याचं झाल्यावर त्याच्या पोटावर सात ठिकाणी तापलेल्या दाभणाने डागण्या दिल्या गेल्या. अशा प्रथा जीवघेण्या ठरू शकतात, त्यामुळे बाळाला संसर्ग होऊ शकतो किंवा अन्य दुखापती होऊ शकतात. पण तरीही अशा सामाजिक रिवाजांचे आजही पालन केले जाते. बऱ्याचदा विशिष्ट सामाजिक प्रथा या त्या त्या समाजाची ओळख असते. या समाजांची व्यापक ओळख होईल, त्यांना सामाजिक मान्यता मिळेल तशा या प्रथा कदाचित मागे पडतील.

**दिवस राहिल्याची वाच्यता केली जात नाही -**

शुअर स्टार्ट प्रकल्पाचा एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे मासिक पाळी सर्वेक्षण. कार्यक्षेत्रातील सर्व पात्र जोडप्यांचे –सर्व ४५ वयापर्यंतचे विवाहित – नियमित सर्वेक्षण केले जाते. महिलेची पाळी चुकली आहे की नाही, म्हणजेच तिला दिवस गेले आहेत का हे जाणून घेणे हा या सर्वेक्षणाचा उद्देश आहे. जितक्या लवकर गरोदरपणाचे निदान होईल तितक्या लवकर तिला आरोग्य शिक्षण देता येईल असा या मागचा आडाखा आहे. दवाखान्यात लवकरात लवकर नोंदणी घेतल्याने सुरक्षित बाळंतपणासाठीच्या सर्व सेवांचा तिला लाभ मिळवून देता येतो. पण सर्वेक्षणादरम्यान महिला पाळी चुकल्याचे वा दिवस राहिल्याचे सांगत नाहीत. अर्थात असे करण्यामागेही काही सामाजिक धारणा आहेत. कोणालाही सांगितले तर नजर लागेल, बाहेरच्या व्यक्तीची नजर लागेल, भूतबाधा होईल असा एक समज आहे. तर 'अतिउत्साह" दाखवायचा नाही, आणि म्हणून उशीरा म्हणजे चौथ्या महिन्यानंतर नोंदणी करायची असेही काही लोक करतात. बाळंतपणाची पूर्वतयारी करावी, बाळाचे कपडे, वाहनव्यवस्था इत्यादीचा विचार करून ठेवावा असं आरोग्य शिक्षणात सांगितलं जातं. पण 'पिशवी आवरून ठेवायची नाही" असं काही लोक मानतात आणि तसं करतातही.

सोलापूर शहरात दोनशेहून अधिक वस्त्या आहेत. यातील बऱ्याच वस्त्या विशिष्ट समाजाच्या नावाने ओळखल्या जातात – बहुरूपीनगर, जोशी वस्ती, मातंग वस्ती इ. काही वस्त्या संमिश्र आहेत. पण लोक आपल्या समाजाला धरून राहात आहेत, आपल्या चालीरिती, प्रथा पाळत आहेत, असेच दिसते. शुअर स्टार्ट प्रकल्पाचे काम ज्या ७३ वस्त्यांमधून चालू आहे तिथेही अशा अनेक प्रथा आढळतात. माता आणि शिशु आरोग्याचा विचार करता काही चालीरिती बदलण्याच्या दृष्टीने जागृती होण्याची गरज आहे.

## नोंदणी, तपासणीचे महत्त्व उमजले...



शास्त्रीनगर ही कष्टकऱ्यांची एक संमिश्र वस्ती. या वस्तीतील मोची समाजातली एक सूनमाता श्रीदेवी म्हेत्रे. शिक्षण बेताचे असल्याने श्रीदेवी घरी बसून जो रोजगार मिळेल तो करते. कधी उशीचे कव्हर शिवायचे, कधी आणखी काही. श्रीदेवीचा नवरा गवंडीकाम करतो.



*गरोदर स्त्रियांशी वैयक्तिक संपर्क महत्त्वाचा*

श्रीदेवी तिसऱ्या खेपेला गरोदर असताना तिचा शुअर स्टार्ट कार्यकर्त्यांशी संपर्क झाला. आधीची दोन बाळंतपणे झाली असल्याने तिला गरोदरपणाचा अनुभव होता. आपली पाळी चुकली म्हणजे दिवस राहिले असं तिनं समजून घेतलं. तीन महिने उलटून गेले तरी तिनं दवाखान्यात जाऊन तपासणी वगैरे असं काही करून घेतलं नव्हतं. कदाचित कार्यकर्त्यांनी तिला दवाखान्यात जायचं सांगितलं नसतं तर ती गेलीसुद्धा नसती. पहिल्या बाळंतपणात बाईची काळजी घेतली जाते, पण पुढच्या प्रत्येक बाळंतपणाबरोबर ती कमी कमी होत जात असते.

श्रीदेवीला पाचवा महिना लागल्यावर पुन्हा तिची भेट झाली. कार्यकर्त्यांनी तिची चौकशी केली. श्रीदेवी त्यांच्याशी व्यवस्थित बोलली, पण अद्याप तिनं तपासणी, नोंदणी असं काहीच केलं नव्हतं. तिच्याशी सातत्याने संपर्क ठेवल्याचा परिणाम आणखी काही दिवसांनी जाणवला. पाचवा महिना संपता संपता श्रीदेवीनं सरकारी दवाखान्यात नाव नोंदवलं आणि आपली सगळी कागदपत्र घेऊन ती आपणहून कार्यकर्त्यांना भेटायला आली. त्यानंतर ती नियमितपणे तपासणी करून घेत राहिली.

शुअर स्टार्ट प्रकल्पाच्या वतीने शास्त्रीनगर वस्तीमध्ये एक आरोग्य शिबिर आयोजित केलं होतं. डॉक्टरांनी तिला तपासलं. तिचे दिवस उलटून गेल्यानं सोनोग्राफी करून घेण्याचा सल्ला त्यांनी दिला. पैशांची अडचण असल्यानं श्रीदेवी घरी काहीच बोलली नाही. एक-दोन दिवस असेच गेले. प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांनी श्रीदेवीच्या घरी जाऊन तिची सासू आणि नवरा यांच्याशी बातचीत केली. सरकारी दवाखान्यात सवलतीच्या दरात सोनोग्राफी करून मिळेल ही माहितीही दिली. घरच्यांशी बोलल्यावर मात्र सर्वांनी तातडीने निर्णय घेतला आणि श्रीदेवीला दवाखान्यात नेण्यात आले. दोन दिवसांनी दवाखान्यात बाळंतपण झाले. श्रीदेवीला मुलगी झाली. तिसऱ्या बाळानंतर तिनं कुटुंबनियोजनाचं ऑपरेशनही करून घेतले. सर्व काही सुखरूप झाल्याने नवरा, सासू सगळेच आनंदात होते.

गरोदर मातेची विचारपूस करणे, तिला वेळच्या वेळी योग्य ती माहिती देणे अशा अगदी साध्या वाटणाऱ्या गोष्टीतून बाळंतपण सुरक्षित करण्याची खबरदारी घेता येते. आज शुअर स्टार्ट प्रकल्पातील कार्यकर्ते आणि वस्ती स्वयंसेवक अशाच प्रकारचे आरोग्य शिक्षण गरोदर मातांपर्यंत पोहोचवत आहेत. या आरोग्य शिक्षणामुळे गरोदरपणातील आणि बाळंतपणातील आवश्यक ती काळजी घेण्याविषयी जागृती वाढत आहे.

## मानसिक आधार मिळाला...

**दिपाली नंदूरकर**

संजयनगर वस्तीतल्या सीमाचं लग्न वयाच्या पंधराव्या वर्षी झालं. लग्नानंतर दीड वर्षांनी तिला दिवस राहिले. वय लहान असल्यानं आणि पहिलटकरीण असल्यानं घरच्यांनी तिची चांगली काळजी घेतली. सीमा सुखरूप बाळंत झाली आणि तिला मुलगा झाला. पहिला मुलगा चार वर्षांचा असताना सीमाला पुन्हा दिवस राहिले. ती राहायची त्या वस्तीलगतच सरकारी दवाखाना होता, तिथं सीमाचं नाव नोंदवलं गेलं. पण यावेळी तिच्यासोबत वडीलधारं बाईमाणूस कोणीच नव्हतं. नवरा ड्रायव्हरचं काम करायचा, एकदा सकाळी कामाला गेला की रात्रीच परत यायचा. घरची परिस्थिती बरी असली तरी सीमाला सगळं आपलं आपणच करायला लागायचं. त्यामुळे ती कधी तपासण्यांना जायची, कधी नाही.



*विश्वास आणि आधार देणाऱ्या वस्ती स्वयंसेवक*

दुसऱ्या गरोदरपणात सीमाचे पूर्ण दिवस भरले. एकदा सकाळी तिला पोटात दुखल्यासारखं वाटायला लागलं म्हणून तिनं नवऱ्याला सांगितलं. नवरा रिक्षा आणायला गेला आणि सीमा घरालगतच्या बाथरूममध्ये गेली. रिक्षा यायच्याही आत सीमा बाथरूममध्येच बाळंत झाली. बाळ फरशीवर पडलं आणि रडायला लागलं. सीमाही घाबरून आरडाओरडा करायला लागली तेव्हा शेजारचे लोक जमा झाले. बाळाला श्वास घेण्यास त्रास होत होता आणि त्याचा अल्पावधीतच मृत्यू झाला.

सीमाला या प्रकाराचा जबर धक्का बसला. गरोदरपण जोखमीचं वाटायला लागलं. दुसऱ्या बाळाच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनी सीमा पुन्हा गरोदर राहिली. पण तिच्या मनात सतत धाकधूक होती. याच सुमारास शुअर स्टार्ट प्रकल्पाचं काम संजय नगर वस्तीत सुरू झालं होतं. वस्तीतल्या आठवले काकू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फुलाबाईंनी स्वयंसेवक म्हणून जबाबदारी उचचली होती. सीमाच्या घरापासून एक गल्ली ओलांडली की फुलाबाईंचं घर होतं. त्यांनी पूर्वी दवाखान्यात आयाचं काम केलं आहे, त्यामुळे गरोदर बायांशी बोलायचा त्यांना चांगलाच अनुभव आहे. फुलाबाई सीमाकडे सतत येत जात राहिल्या. 'काय खाते, काय नाही याची मी विचारपूस करायचे, दवाखान्यात गेली का नाही म्हणून विचारायचे. घरात कोणी मोठं नसलं की हे सगळं पोरींना सांगावं लागतं," फुलाबाई त्यांचं काम त्यांच्या बोलण्याइतकंच सहजतेनं करतात. त्यांच्या असण्याचा, बोलण्याचा सीमालाही आधार वाटला.

'दुसऱ्या खेपेला मी दवाखान्यात नियमित जायचे नाही, पण यावेळी मात्र सगळं नीट केलं," सीमा सांगते. प्रकल्पाचे कार्यकर्ते आणि फुलाबाईंच्या सतत संपर्कानं सीमा तिच्या दुसऱ्या बाळंतपणाच्या धक्क्यातून बाहेर आली आणि तिनं तिसऱ्या खेपेला स्वत:ची काळजीही घेतली. तिचं बाळंतपण दवाखान्यात व्यवस्थित पार पडलं. सीमाचा दुसरा मुलगा आता सहा महिन्याचा आहे. तिनं स्वत:चं कुटुंबनियोजनाचं ऑपरेशनही करून घेतलं.

# सुमन बचत गटाचा आगळावेगळा निर्णय

मृणालिनी रोहिले

सोलापूरमधील वस्त्यांमध्ये हॅलो मेडीकल फौंडेशनने शुअर स्टार्ट प्रकल्पांतर्गत महिला बचत गट तयार करण्याचे काम सुरू केले आहे. या गटांना आरोग्याचे प्रशिक्षण द्यायचे आणि वस्तीतील गरोदर मातांना दत्तक घेऊन त्यांच्या सुरक्षित बाळंतपणासाठी प्रयत्न करायला प्रोत्साहन द्यायचे, अशी बचत गट करण्यामागची कल्पना आहे. म्युनिसिपल कॉलनीत दहा जणींनी एकत्र येऊन सुमन बचत गट सुरू केला. गेले सहा-आठ महिने या गटातील सदस्य दरमहा शंभर रुपये बचत करतात. सुरुवातीला काही महिने रक्कम बँकेतच ठेवायची असेही त्यांनी ठरवले. त्यामुळे गटांतर्गत कर्जाचे आदानप्रदान अजून सुरू झाले नाही. पण या सहा-आठ महिन्यांच्या कालावधीत बचत गटामुळे होणाऱ्या नियमित भेटीगाठींमुळे गटातील सदस्यांच्या विचारांचे मात्र बरेच आदानप्रदान झाले आहे. त्या आधारे सुमन बचत गटाने एक वेगळाच आणि धाडसी वाटेल असा निर्णय अलिकडे घेतला आहे.



*सुमन महिला बचत गटाच्या सदस्या*

या गटाची अध्यक्ष नरसो आणि सचिव शकुंतला. या दोघी गटातील सक्रीय सदस्या. सुमन सध्या सोलापूरच्या दयानंद कॉलेजात कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण घेत आहे, अविवाहित आहे. तर शकुंतला एका दवाखान्यात आयाचे काम करते. शकुंतलाचं वय २८ वर्षे आहे. पाच वर्षांपूर्वी तिच्या पतीचे निधन झाले. तेव्हापासून ती आपल्या माहेरी राहात आहे. शुअर स्टार्ट प्रकल्पाच्या प्रशिक्षणात सहभागी होणे, वस्तीपातळीवर गरोदर महिलांशी संपर्कात राहणे, किशोरी गट तयार करणे या सर्व कामात नरसो आणि शकुंतला यांचा पुढाकार असतो. गटातील अन्य सदस्य कविता, अनुराधा यांचीही त्यांना खूप मदत होत असते. अनुराधा आणि शकुंतला या सख्ख्या बहिणीही आहेत.

शकुंतलानं लग्न करावं असं तिच्या घरच्यांचं बऱ्याच दिवसापासून तिला सांगणं आहे. तिला मात्र पुन्हा लग्न करण्याची इच्छा नाही. पण माता-शिशु आरोग्याचं ज्ञान मिळाल्यापासून तिला आपलं मूल असावं असं वाटू लागलं. एकदा तिनं गटातल्या आपल्या मैत्रिणींना ही भावना बोलूनही दाखवली. शकुंतलाच्या एकटेपणाविषयी सगळ्यांनाच सहानुभूती वाटत असल्यानं त्यांनी तिच्या भावनांशी सहमती दर्शवली. तिनं अनाथाश्रमातून एखादं मूल दत्तक घ्यावं असाही पर्याय पुढे आला. शकुंतलालाही ही कल्पना रूचली.

याच दरम्यान शकुंतलाची बहीण आणि गटातली एक सदस्य असलेल्या अनुराधाला दिवस राहिले. अनुराधाचा पहिला मुलगा पाच वर्षांचा, तर दुसरी मुलगी तीन वर्षांची आहे. तिची दोन्ही बाळंतपणं सिझेरीयन झाली आहेत. त्यामुळे तिला व तिच्या पतीला पुन्हा तिसरं मूल नको होतं. अनुराधानं शकुंतलाला आपलं मूल देण्याचा निर्णय घेतला. शकुंतलालाही बहिणीचं मूल दत्तक म्हणून घेण्यामध्ये कोणतीच हरकत नव्हती. अर्थात ही कल्पना दोघींच्या कुटुंबियांना पसंत पडणेही आवश्यक होते. अनुराधानं पुढाकार घेऊन आपल्या नवऱ्याशी, सासू-सासऱ्यांशी बातचीत केली. तिसरं मूल त्यांना नको होतं. त्यामुळे गर्भपात करण्याऐवजी त्याला दत्तक देणं अधिक योग्य आहे असा सर्वांनी विचार केला. बचत गटानं, विशेषत: नरसोनं, शकुंतला आणि अनुराधाच्या कल्पनेला उचलून धरलं.

अनेकांनी शंका उपस्थित केल्या - 'नऊ महिने पोटात वाढवलेलं बाळ कोण दुसऱ्याला देईल का ?" काहिंनी काळजी व्यक्त केली - 'आत्ता सगळे चालेल म्हणतायत, पण नंतर नाही दिलं बाळ तर शकुंतलाला किती वाईट वाटेल !" ही सर्व मतमतांतरे लक्षात घेऊन शकुंतला, नरसो आणि अनुराधानं ठरवलं की आपण करारनाम्यासारख्या सर्व गोष्टी ठरवून घ्यायच्या. म्हणजे मग नंतर कोणाचीच निराशा व्हायला नको. शकुंतलानं आपल्या बहिणीची गरोदरणपणाची आणि बाळंतपणाची सर्व जबाबदारी उचलली. तिच्या येणाऱ्या बाळासाठी सगळा खर्च तिनं करायचा असं ठरलं. मूल झाल्यावर ते शकुंतलाच्या हवाली करायचं व तशी कागदपत्रांची पूर्तता करायची असं अनुराधानं ठरवलं. या आगळयावेळ्या निर्णयामुळे गटामध्ये एक वेगळंच चैतन्य निर्माण झालं आहे.

गटाला सहा महिने पूर्ण झाल्याने आता गटांतर्गत व्यवहार सुरू होतील. जमलेल्या रकमेतून तीन व्यक्तींना कर्ज दिलं जाणार आहे, शकुंतला, नरसो आणि आणखी एक सदस्य. शकुंतला बहिणीच्या बाळंतपणासाठी पैशांची तजवीज करण्यासाठी कर्ज घेत आहे. नरसोही शकुंतलाला उपयोगी पडेल म्हणून स्वत:च्या नावावर तिच्यासाठी कर्ज घेत आहे. 'लोक काहीही शंका घेऊ देत, पण मी बोलले तर करून दाखवणारच," हा अनुराधाचा निग्रह आहे. शकुंतला, नरसो याही बाळाच्या आगमनासाठी उत्सुक आहेत.

बचत गटामुळे, आरोग्याच्या प्रशिक्षणामुळे या स्त्रियांमध्ये स्वत:विषयी विचार करण्याची आणि ते विचार व्यक्त करण्याची एक वेगळीच ताकद निर्माण होत आहे, हे मात्र निश्चित.

# शहापूर चाळीतील "सहेली"

सॉलेहा सय्यद

शहापुरे चाळ ही तीन-साडेतीन हजाराची मुस्लिम वस्ती. शुअर स्टार्ट प्रकल्पाच्या अगदी सुरुवातीच्या सर्वेक्षणाच्या दरम्यान इथल्या महिलांना बचत गटाची माहिती देण्यात आली होती. त्यांनीही उत्साहाने प्रतिसाद दिला. आणि वस्तीत सहेली बचत गटाची सुरुवात झाली. शहापुरे चाळीतला हा पहिलावहिला बचत गट आणि प्रकल्पात सुरू झालेलाही हा पहिला गट आहे.

सहेली गटानंतर या ठिकाणी आणखी एक गट तमन्ना बचत गट सुरू झाला. सहेली बचत गटामध्ये एकूण १६ सदस्य आहेत आणि दरमहा शंभर रूपये बचत केली जाते. ऑक्टोबर २००९ मध्ये गटाला दोन वर्षे पूर्ण होत आहेत. या गटाच्या निगार, मुबस्सरीन आणि अनिशा या गटाच्या वतीने स्वयंसेवक म्हणून काम करतात. गटाविषयी, गटाच्या कामाविषयी बोलताना या महिलांचा उत्साह भरभरून वाहात असतो. कारण गटामुळे त्यांना अनेक नव्या गोष्टी पाहायला, शिकायला आणि करायला मिळत आहेत.



*गटामुळे वस्तीतील वावर वाढला*

सहेलीच्या सदस्या प्रकल्पाच्या आरोग्य प्रशिक्षणांमध्ये नियमितपणे सहभागी होतात. प्रशिक्षणातून त्यांना प्रथमच स्वत:च्या शरीराविषयी आणि आरोग्याविषयी माहिती मिळाली. निगार म्हणाली, 'पहले ये कुछ मालूम नही था, प्रशिक्षणमें फिल्म देखनेको भी हम शरमते थे. बहोत हसते थे तब. बादमें पता चला शरम हटाना जरूरी है. आजकल ये सब मालूम होना चाहिये. एचआयव्ही का कितने सुनते है हम...." आरोग्य शिक्षणाचं महत्त्व या महिलांना समजल्यावर त्यांनी मग ते गटातल्या इतर सदस्यांना आणि वस्तीतल्या गरोदर महिलांना सांगायला सुरुवात केली. आपली माहिती इतरांना सांगून सांगून त्यांनी ती आत्मसात केली आणि यामुळे आरोग्याविषयी बोलण्याचा त्यांचा संकोचही दूर झाला. 'प्रशिक्षणके बाद हमलसे औरतको मिलके ये जानकारी देते थे, फीर बोलबोलके शरम हट गयी!" काही महिला आता आपल्या वयात येणाऱ्या मुलींनाही मासिक पाळीविषयी स्वत: सांगू शकतात.

गटामुळे आपल्याला माहिती झाली, काही नव्या गोष्टी समजल्या ही या सर्वांची भावना आहे. 'पहले बस्तीमेभी क्या हो रहा क्या नही कहॉ पता होता था, कौन प्रेगनंट है येभी मालूम नही रहता." आज मात्र परिस्थिती वेगळी आहे. गरोदर स्त्रियांची सर्व माहिती या महिलांना आहे. त्यांच्याशी या महिलांचा नियमित संपर्क आहे. कुणाच्याही मदतीला या सदैव तयार असतात. 'आज पुरा मालूम है, २७ पीएनसी है और १२ एएनसी." आजवर दत्तक घेतलेल्या मातांचा अचूक आकडा गटाच्या लक्षात आहे.

"हमलसे औरत को मिलते, उसे बोलते, चेक अप करो, टीटी करो, अच्छा रहता," गटातील महिला सांगतात. साधारण चौथ्या महिन्यापासून थोडे पैसे बाजूला काढून ठेवायचा सल्लाही दिला जातो. म्हणजे बाळंतपणाच्या वेळी बाईच्या हाताशी थोडे पैसे राहतात. सातव्या-आठव्या महिन्यानंतर जवळपासच्या रिक्षावाल्याचा नंबर घ्यायला सांगतात. पूर्वतयारीच्या या साध्या साध्या गोष्टी किती महत्त्वाच्या आहेत, हे महिलांनाही अनुभवांती समजत आहे.

माहिती दिली तरी सर्वचजणी ऐकतात असं होत नाही. विशेषत: अगदी सुरुवातीला गटातल्या महिलांनी सांगितलेलं फारसं कोणी मनावर घ्यायच्या नाहीत. पण वस्तीमध्ये अशा काही घटना घडल्या की ज्यामुळे या माता व शिशु आरोग्याविषयी बचत गट जे सांगतोय त्याचं महत्त्व अधोरेखित झालं. वस्तीमध्ये सूनमाता असलेली एक महिला तिच्या पहिल्या बाळंतपणासाठी सातव्या महिन्यात माहेरी गेली. वस्तीत असेपर्यंत तिनं सर्व तपासण्या, गोळ्यांचे सेवन वगैरे व्यवस्थित केले. पण माहेरी तिचं बाळंतपण घरीच झालं, त्यानंतर तिच्या योनीला टाके घातले गेले नाहीत आणि काही दिवसांनी गर्भाशय बाहेर आलं. नंतर मात्र घरच्यांनी तिला लगेच दवाखान्यात नेलं आणि तातडीच्या उपचारांनी तिची प्रकृती झपाट्याने सुधारली. आणखी एका घटनेमध्ये एका गरोदर महिलेने घराची आवराआवर करताना कॉट हालवली. त्यावेळी तिला आठवा महिना चालू होता. गर्भाशयावर ताण आल्यानं तिला रक्तस्राव सुरू झाला. 'ऐसा कुछ होता है तो औरता बोलते है की आप बराबर कहते थे, हम सब ठीकसे करेंगे, उनके जैसा नही होना..." गरोदरपणातील संभाव्य धोके आणि त्यासाठी घ्यायची काळजी याविषयीची माहिती गटाच्या माध्यमातून वस्तीतील महिलांपर्यंत पोहोचत आहे.



*सहेली गटाच्या सदस्या*

बचत गटाचे इतरही उपक्रम चालू आहे. गटातून कर्ज घेऊन काही महिलांनी छोटेमोठे व्यवसाय आपल्या घरात सुरू केले आहेत. कोणी घरगुती सामान विकतं, कोणी बांगड्या तर कोणी ड्रेस मटेरीयल. काही महिन्यांपूर्वी गटांतर्गत पोषक आहार स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. गटाचा पहिला 'बर्थ डे"ही थाटामाटात केक कापून साजरा झाला!

महिला गटाचं हे काम त्यांच्यासाठी किती महत्त्वाचं आहे हे आता त्यांच्या घरीही पटलंय. 'पहले घरके बाहर बिल्कूल नही छोडते थे, लेकीन अब गट के वास्ते हमको फ्री छोडे है," अनिशा उत्साहानं सांगते. गटाच्या कसल्याही कामासाठी जायला आता घरच्यांची ना नसते. बचत गट आणि माता व शिशु आरोग्य शिक्षणाचं काम यामुळे स्वयंसेवक महिलांची एक वेगळी ओळख वस्तीमध्ये तयार होत आहे. आणि त्याचा या महिलांना अभिमान वाटतो. नुकताच वस्तीतल्या अंगणवाडीत बालकांच्या कुपोषणाविषयी माहिती देण्यासाठी एक कार्यक्रम झाला.